कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६८ /२०२६ दि. २४ /०३/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील **कोळसेवाडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. २६/०३/२०२६ रोजी **' श्रीराम नवमी '** निमित्ताने श्रीराम सेवा मंडळ, पत्रीपुल, कचोरेगाव, कल्याण पूर्व यांचेवतीने रथयात्रा मिरवणूक आयोजीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) पत्रीपुल कडून न्यु गोविंदवाडी, विकासनाका कल्याण पूर्व कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **श्री. शकील खान यांचे जनसपर्क कार्यालय, कचोरे कल्याण पूर्व** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने पत्रीपुल – नेतीवली – टाटानाका मार्गे तसेच पत्रीपुल – ९० फुटरोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) विकासनाका, न्यु गोविंदवाडी, कल्याण पूर्व कडून पत्रीपुल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **न्यु गोविंदवाडी, नेतीवली पाण्याच्या टाकीकडून उतरणीच्या रस्त्यालगत, कल्याण/डोंबिवली पूर्व** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने विकासनाका – टाटा नाका – कल्याण शिळरोड मार्गे तसेच खंबाळपाडा रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. २६/०३/२०२६ रोजी सायंकाळी १५:०० वा. ते रात्रौ २२.०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.